# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १७९ वा बुधवार दि.१३ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## अधिवेशनातील दोन दिवसांच्या चर्चेनंतर ५५ हजार ५२० कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर

नागपूर : उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सादर केलेल्या ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात मंगळवारी (१२ डिसेंबर) मंजूर करण्यात आल्या.पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांची निर्मिती, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची संधी पोहोचवण्यात येणार आहे. केंद्राच्या योजनांच्या मॅचिंग ग्रँटचाही पुरवणी मागण्यांमध्ये समावेश असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तरात सांगितले. पुरवणी मागण्यांमुळे वाढलेली महसुली व राजकोषीय तूट वर्षअखेरीस उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून आणि प्रत्यक्ष खर्चावर नियंत्रण ठेवून कमी करण्यात येईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४८ हजार ३८४ कोटी ६६ लाख रुपये विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधिमंडळात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. त्यावर सोमवारी आणि आज मंगळवारी सभागृहात सविस्तर चर्चा झाली. अनेक सदस्यांनी त्यावर आपले मत मांडले. विधान परिषदेत चर्चेला उत्तर देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्थूल पुरवणी मागण्या ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या दिसत असल्या तरी प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४८ हजार ३८४ कोटी ६६ लाख रुपये एवढाच आहे. सर्व विभागांच्या मिळून ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. त्यापैकी १९ हजार २४४ कोटी ३४ लाख रुपयांच्या मागण्या अनिवार्य खर्चाच्या आहेत. कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३२ हजार ७९२ कोटी ८१ लाख रुपयांच्या मागण्या आहेत.केंद्रपुरस्कृत कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३ हजार ४८३ कोटी ६२ लाखांची तरतूदकेंद्रपुरस्कृत कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या ३ हजार ४८३ कोटी ६२ लाख रुपयांच्या मागण्या आहेत. केंद्राच्या ज्या योजना राज्यात सुरु आहेत, त्याला मॅचिंग ग्रँट देण्यासाठीचा हा खर्च आहे. याचा फायदा राज्यात पायाभूत सुविधांची निर्मिती आणि सर्वसामान्य घटकांपर्यंत विकासाची संधी पोहोचविण्यासाठी होणार आहे.

पिकविमा, कांदा उत्पादकांसाठी आर्थिक तरतूद पुरवणी मागण्यातील महत्वाच्या तरतुदींबद्दल माहिती देतांना त्यांनी सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने नमो शेतकरी सन्मान निधी योजनेकरिता २ हजार १७५ कोटी २८ लाख, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या हप्त्यासाठी २ हजार ७६८ कोटी १२ लाख रुपये, शेतकऱ्यांना अल्प मुदतीच्या पीक पुरवठ्यासाठी २१८ कोटी, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेसाठी १०० कोटी रुपये, कांदा उत्पादकांना अनुदानासाठी ३०१ कोटी ६७ लाख रुपये, अशा तऱ्हेने कृषी क्षेत्रासाठी ५ हजार ५६३ कोटी ७ लाख .

## नवीन सरकारला सदैव सहकार्य करेन

भोपाळ : मध्य प्रदेशच्या नव्या मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर शिवराज सिंह चौहान यांनी मोठे विधान केले आहे. मी कुठेही जात नाही. येथेच राहणार आहे आणि नवीन सरकारला नेहमीच पाठिंबा देईल असे शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे. तत्पूर्वी, मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर शिवराज सिंह चौहान यांनी पहिल्यांदा लाडली बहिणींची भेट घेतली. यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री अतिशय भावूक दिसले. तसेच, काही बहिणींनी त्यांना मिठी मारली आणि रडू लागल्या.मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर पहिल्यांदाच शिवराज सिंह चौहान यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की मी राज्याच्या नवीन मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. नूतन विधानसभा अध्यक्षांचेही अभिनंदन. मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा झपाट्याने विकास होईल अशी मला पूर्ण आशा आहे. मी त्याला



नेहमीच पाठिंबा देईन. दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपने शिवराज सिंह चौहान यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून समोर आणले नाही. मात्र, यादरम्यान शिवराज सिंह चौहान यांनी राज्याच्या कानाकोप-यात जाऊन प्रचार केला होता.शिवराज सिंह चौहान पुढे म्हणाले, आज माझ्या मनात समाधानाची भावना आहे. २००३ मध्ये उमा भारती यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. मी त्याच सरकारला पुढे नेले. २००८ आणि २०१३ मध्ये जनतेच्या आशीर्वादाने आमचे सरकार स्थापन झाले. २०१८ मध्येही आमची मतांची टक्केवारी जास्त होती, जागा नक्कीच कमी होत्या. तसेच, २०२३ मध्ये जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा सरकार स्थापन झाले आहे. यावर मी समाधानी आहे. आज मी येथून निरोप घेत आहे.आम्ही जनतेच्या विश्वासावर टिकलो मध्य प्रदेशच्या नव्या मुख्यमंत्र्याच्या घोषणेनंतर आता राज्यात शपथविधीची तयारी सुरू आहे. या सगळ्या दरम्यान शिवराज सिंह चौहान म्हणाले, आम्हाला बिमारू राज्य मिळाले होते. माझ्यात जेवढे सामर्थ्य होते, तेवढेच मी या राज्याच्या विकासासाठी प्रयत्न केले. उत्तम रस्ते, वीज व्यवस्था आणि कृषी क्षेत्राचा वेगवान विकास केला. मेट्रो-ट्रेनपर्यंत प्रवास केला. तसेच, मेडिकल कॉलेज आणि सीएम रायझ स्कूल बांधण्याचे काम केले. पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या विकासासाठी प्रयत्न केले. आम्ही जनतेच्या विश्वासावर टिकू शकलो आहोत असे वाटते.

## श्री भगवान सहस्त्रबाहू आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या उद्देशाने विधानभवनावर धडक मोर्चा

नागपूर :- १२ डिसेंबर २०२३ ला इंदोरा मैदान येथून विधानभवनावर धडक मोर्चा काढण्यात आला यावेळी हजारोंच्या संख्येने समाज बांधव सहभागी होते. कलाल-कलार समाज हा मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र विखुरलेला आहे.परंतु महाराष्ट्रामध्ये कलाल -कलार समाजावर होत असलेल्या सामाजिक व आर्थिक अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात राज्याचा एकही प्रतिनिधी नसल्याने समाजातील प्रश्न शासनापर्यंत पोहचु शकत नाही.यामुळे समाज प्रगतीच्या मार्गापासून व शासनाच्या योजनांच्या प्रवाहापासुन दुरावलेला आहे.आज संपूर्ण महाराष्ट्रात कलाल -कलार समाजातील संपूर्ण शाखांचा विचार केला तर समाजाची लोकसंख्या ५५ लाखापेक्षा अधिक आहे. आजही संपूर्ण समाज कळत-नकळत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजसेवा व देश सेवा करीत आहे.परंतु आजही विचार केला तर कलाल -कलार समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे आपल्याला दिसुन येते.यामुळे समाजातील बेरोजगार व शिक्षित युवकांना मोठा फटाका बसत आहे.याकरिता कलाल -कलार समाजाकरीता सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे मोर्चाच्या माध्यमातून समाजाची मागणी आहे की १)भगवान सहस्त्रबाहू आर्थिक विकास



महामंडळ सरकारने स्थापन करावे.२)कलाल-कलार समाजातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर वस्तीगृहासाठी राज्य शासनाने नाम मात्र किंमतीत समाजाला जागा उपलब्ध करून द्यावी.३) केंद्र सरकारच्या विश्वकर्मा योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने कलाल -कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय (मद्य विक्री) परवाण्यात समाजाला सरकारने प्रथम प्राधान्य द्यावे.या मागण्यांचे निवेदन शिष्टमंडळाच्या माध्यमातून सन्माननीय मंत्री अतुलजी मोरेश्वर सावे , गृहनिर्माण,इतर मागास व बहुजन कल्पना मंत्री यांना देण्यात आले यामध्ये संघटनेचे मार्गदर्शक व पर्यावरण मित्र चंद्रपालजी चौकसे,संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार, सरचिटणीस संतोष खंबलवार, प्रदेश प्रवक्ता रमेश लांजेवार, जैन कलार समाजाचे नागपूर जिल्हा अध्यक्ष श्रीकांत शिवनकर, जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळाचे माजी अध्यक्ष अनिलजी अहिरकर, अध्यक्ष चंद्रशेखर आदमने, माजी मंत्री अविनाशजी वारजुरकर, माजी आमदार श्री केशवराव मानकर,शशिकांतजी समर्थ,विजय उजवणे, रविंद्र हटवार, फाल्गुन उके ,डॉक्टर प्रमोद मेहस्रे ,महेंद्र डोहरे ,नरेंद्र धुवारे ,दीपक वालोदे , प्रमोद मानकर, शेखर डहरवाल,खिलेंद्र बिठले, दिपक उके,सुरेश चौरीवार,राजू वारजूरकर,विश्वास गोसेवाडे,

प्रशांत तिडके , मंगेश डांगे , श्री वासेकर,सतीश दखने , रुपाली उके, संदीप तिडके , नंदलाल कावरे,मंगेश खानोरकर , सुनील दहीकर, गजानन पटेल, ड.सुर्यकांत जैस्वाल, संजय ठठेरे, दिपक आदमने,सौ.सिमा खंबलवार, रूपाली उके,सुरेश आदमने,विक्रांत पालांदुरकर, सुनील खराटे,पंकज दहिकर, बाबाराव देवलावार, नितीन बासंबे,सौ. संगिता ठठाल, सुरेश मेश्राम, अनिलजी पिंपळे, सुरेश सौ.विणा पटेले,आणि सर्व शाखेचे संपूर्ण समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## दिशा सालियनप्रकरणी एसआयटी स्थापन

नागपूर : दिशा सालियान आत्महत्या प्रकरणी राज्य सरकारकडून मुंबई पोलिसांना एसआयटी (रकळ) स्थापन करण्याचे लेखी आदेश देण्यात आले होते. त्यानंतर तत्काळ कार्यवाही झाली असून मुंबई पोलीस आयुक्तांनी एसआयटी स्थापन केली असून तपास अधिका-यांची नेमणूक केली आहे. मुंबई पोलिस आयुक्तांनी दिशा सालियान आत्महत्या प्रकरणी फेरतपासाचे आदेश दिले आहेत. अप्पर पोलिस आयुक्त उत्तर विभाग राजीव जैन हे एसआयटीचे नेतृत्त्व करणार आहेत.गेल्या हिवाळी अधिवेशनात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिशा सालियान मृत्यू प्रकरणी रकळ चौकशीचे आदेश दिले होते. अखेर आज मुंबई पोलिसांना एसआयटीसंदर्भात लेखी आदेश देण्यात आले आहेत. मुंबई पोलिस आयुक्तांनी दिशा सालियान मृत्यु प्रकरणी फेरतपासाचे आदेश दिले आहेत. परिमंडळ ११ चे पोलीस उपायुक्त अजय बन्सल आणि मालवणी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक चिमाजी आढाव यांच्या नेतृत्वात प्रकरणाचा तपास करण्यात येणार आहे. त्याशिवाय, अप्पर पोलीस आयुक्त उत्तर विभाग



राजीव जैन हे टीमचं नेतृत्व करणार आहेत. यामध्ये क्राईम ब्रांच आणि इतर युनिट्सच्या तज्ञ अधिका-यांचा समावेश करण्यात येणार आहे. दिशा सालियान हीने आत्महत्या केली असल्याचे मुंबई पोलिसांनी आपल्या आधीच्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले होते. त्यानंतर दिशा सालियान आत्महत्या प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले होते. यामध्ये शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर भाजप आमदार नितेश राणे यांच्याकडून सातत्याने आरोप सुरू होते. आता विशेष चौकशी स्थापन करण्यात आल्यानंतर पुन्हाने तपास होणार आहे.

## पानगाव - खरोळा फाटा रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात: आ कराड यांच्या प्रयत्नाला अखेर यश

लातूर दि.१२ :- लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील पानगाव ते खरोळा पाटी यादरम्यानच्या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या कामाला ११ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष सुरुवात झाली असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याने पानगाव आणि परिसरातील भाजपा लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्यासह जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे.

पानगाव ते खरोळा पाटी आणि रेणापूर फाटा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एच हा रस्ता लातूर बीड रस्त्याला जोडणारा असून धर्मापुरी ते पानगाव आणि खरोळा पाटी ते रेणापूर फाटा दरम्यानच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले. मात्र खरोळा पाटी ते पानगाव १४.२ किमी लांबीचे काम रस्त्या लगतच्या शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण केल्याने रखडले होते. सदरील रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाला होता याचा वाहनधारकासह सर्वसामान्य नागरिकांना सातत्याने अडचणीला तोंड द्यावे लागत होते.

रस्त्याची दुरावस्था आणि पानगाव व परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्त्व पटवून दिल्याने संबंधित





शेतकरी रस्त्याचे काम सुरू करण्यास अनुकूल झाले. ही बाब दिल्ली दौऱ्यात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन सदरील रस्त्याचा प्रश्न गांभीर्याने घेऊन लवकरात लवकर निकाली काढण्याची आ. कराड यांनी मागणी केली असता मंत्री महोदयांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान काळात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी संपर्क साधून लेखी तोंडी मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे मंत्री महोदयाच्या सूचनेनुसार संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडून रखडलेल्या रस्त्याची पाहणी करून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात आली आणि वर्षानुवर्ष रखडलेला पानगाव रस्त्याचा प्रश्न निकाली निघाला.

रस्त्याचा प्रश्न भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने पानगाव ते खरोळा फाटा दरम्यानच्या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष ११ डिसेंबर २०२३ रोजी सुरुवात झाली आहे. रस्त्याचे काम सुरु झाल्याने पानगाव आणि परिसरातील वाहनधारकासह भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## औद्योगिक उत्पादनात ११.७ टक्क्यांनी वाढ; १६ महिन्यांचा उच्चांक

नवी दिल्ली : देशातील औद्योगिक उत्पादनात ऑक्टोबर महिन्यात मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे.औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा दर ऑक्टोबरमध्ये ११.७ टक्क्यांच्या १६ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे. ही वाढ उत्पादन, खाणकाम आणि ऊर्जा क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे झाली आहे. मंगळवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, भारताच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकाचा (आयआयपी) वाढीचा दर ऑक्टोबर २०२३ मध्ये ११.७ टक्क्यांच्या १६ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे.



८ प्रमुख क्षेत्रांचा विकास दर ऑक्टोबरमध्ये १२.१ टक्के राहिल्याने देशातील औद्योगिक क्षेत्राने वेग पकडला असल्याचे यातून दिसून येते.जून २०२२ मध्ये आयआयपी वाढीचा उच्च स्तर १२.६ टक्के होता. वर्षभरापूर्वी याच महिन्यात औद्योगिक उत्पादनात ४.१ टक्के घट झाली होती. नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिसने (एनएसओ ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, उत्पादन क्षेत्रातील उत्पादन ऑक्टोबर महिन्यात १०.४ टक्क्यांनी वाढले होते, तर वर्षभरापूर्वी त्यात ५.८ टक्क्यांची घसरण झाली होती. खाण क्षेत्राचा विकास दर १३.१ टक्के होता जो मागील वर्षी याच कालावधीत २.६ टक्के होता. त्याच वेळी, वीज क्षेत्रातील उत्पादनात २०.४ टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

## संपादकीय....

# पुन:पुन्हा कांद्याचा वांदा!

राज्यात सध्या विविध आंदोलनांचे पेव फुटले आहेत. अर्थात या आंदोलनांचे निष्कारण प्रयोजन आहे असे नाही. आपापल्या न्याय्य मागण्यांसाठीच ही आंदोलने केली जात आहेत. कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली, दुधाचे दर घटविले, इथेनॉल उत्पादनावर निर्बंध म्हणून आंदोलने छेडली जात आहेत. आरक्षणाच्या प्रश्नावर तर विविध समाजाची आंदोलने सुरूच आहेत. एकूण काय तर सध्या महाराष्ट्र विविध आंदोलनांच्या जाळ्यात अडकला आहे. दर दोन-चार वर्षांनी कांद्याचा वांधा होतच असतो. कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातीवर बंदी लागू केली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभरात पडसाद उमटले आहेत. या बंदीचा थेट फटका राज्यातल्या कांदाउत्पादक शेतक-यांना बसणार आहे. त्यामुळे कांदाउत्पादक शेतक-यांसोबत व्यापा-यांमध्येही तीव्र नाराजी आहे. नोव्हेंबर महिन्यात शेतक-यांवर अस्मानी संकट कोसळले. त्यानंतर आता आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने कांदाउत्पादकांच्या विरोधात सुलतानी निर्णय घेतल्याने संतापाची लाट पसरली आहे. कांदा निर्यातबंदीच्या निर्णयानंतर अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याचे लिलाव बंद पाडण्यात आले. अनेक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरले आहेत. केंद्र सरकारने ७ डिसेंबर रोजी अर्ध्या रात्री कांदा निर्यातबंदी लागू केल्यामुळे कांद्याच्या दरात निम्यापेक्षा अधिक घसरण झाल्याने एका दिवसात शेतक-यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. त्यामुळे ही कांदा निर्यातबंदी तात्काळ हटवावी यासाठी राज्यातील कांदाउत्पादक शेतकरी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, गृहमंत्री अमित शहा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत म्हणे.अवकाळी पाऊस व गारपिटीने आधीच कांदा शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर शेतक-यांच्या कांद्याला थोडासा अधिकचा दर मिळण्यास सुरुवात झाली आणि केंद्र सरकारने तात्काळ कांद्यावर निर्यातबंदी लादली. त्यामुळे एका दिवसात कांद्याच्या बाजारभावात किमान दोन हजार रुपये प्रति क्विंटलने घसरण झाली आणि शेतक-यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. आधीच चाळीस टक्के कांदा निर्यात शुल्क, त्यानंतर आठशे डॉलर किमान निर्यात मूल्य लागू करून गत चार-साडेचार महिन्यांपासून कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्याचे काम केंद्र सरकारने केले. तेव्हाही शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. चाळीमध्ये साठविलेल्या कांद्याला दर मिळण्यास सुरुवात झाली तेव्हाही नाफेड आणि एनसीसीएफने बफर स्टॉकमधील कांदा काही देशांत स्वस्तात विकून शेतक-यांच्या कांद्याचे भाव पाडले होते. असे काम सातत्याने होत असताना राज्यातील व देशातील विरोधी पक्ष शेतक-यांच्या पाठीशी उभे राहात नाहीत, अशी भावना शेतक-यांच्या मनात निर्माण झाली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. दूधउत्पादक, कांदाउत्पादक, ऊसउत्पादक, कापूस तसेच सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांची भेट घेऊन शेतक-यांच्या विविध मागण्या केल्या. शेतक-यांसंदर्भात सरकार संवेदनशील असून लवकरच सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे गोयल यांनी सांगितले. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शेतीच्या झालेल्या नुकसानीच्या मुद्यावर विरोधकांनी राज्य सरकारला चांगलेच घेरले. लोकशाहीत बहुमताला महत्त्व असल्यामुळे अनेकांचा वांधा होतो. त्यांच्या नाकाला कांदा लावण्याची वेळ येते. त्यात निवडणुका जवळ आल्या की, 'जास्तीची मेजॉरिटी' सगळ्याच पातळीवर गडद होत जाते, त्यामुळे संख्येने अल्प असलेल्यांना कुणी वालीच उरत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे कांद्याचं उत्पादन कमी होऊन भाव वाढतील या भीतीने केंद्र सरकारने निर्यातबंदीचा निर्णय घेतला आणि कांदाउत्पादक शेतक-यांचे धाबे दणाणले. खरे तर या कांद्यानेच काही वर्षांपूर्वी चार राज्यांतील सरकारांना पायउतार केले होते हा इतिहास आहे. आगामी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होईपर्यंत कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे.

त्यामुळे कांदाउत्पादक शेतकरी निराश झाला आहे. पीक हाताशी येऊन खिशात चार पैसे पडतील, असे वाटत असतानाच कांद्याचे भाव पडण्यास सुरुवात झाली आहे. राज्यकर्ते कांद्याची निर्यातबंदी करून मोकळे झाले परंतु शेतक-यांच्या वार्षिक वेळापत्रकात पेरणीपूर्व मशागतीपासून शेतमाल बाजारात पोहोचण्यापर्यंत जी कामे येतात त्यात आता 'दरासाठी आंदोलन' या नव्या कामाची भर पडली आहे. केंद्र सरकारच्या निर्णयानुसार कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करून साखर कारखान्यांनी इथेनॉल प्लांट उभे केले. त्याचे उत्पादन घेऊन कर्जफेड करणे गरजेचे असताना सरकारने त्यावरही बंदी घातली. या तुघलकी निर्णयामुळे ऊसउत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे. इथेनॉल निर्मितीवरील बंदीचे दुहेरी परिणाम होणार आहेत. एकीकडे साखर कारखानदार आणि शेतक-यांचे आर्थिक नुकसान तर होणार आहेच, दुसरीकडे या निर्बंधामुळे इंधनासाठी इथेनॉल पुरवठ्यात अडथळा निर्माण होणार आहे. ज्यामुळे साखर कारखान्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान होण्याबरोबर सरकारच्या इथेनॉल मिश्रणाच्या उद्दिष्टामध्ये अडथळा निर्माण होणार आहे. साखर उद्योगामुळे केंद्र सरकारच्या पेट्रोल आयात करण्यासाठी लागणा-या रकमेमध्ये बचत होऊन परकीय चलन मोठ्या प्रमाणात वाचले आहे. ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली नसेल का? दूधउत्पादकांचेही आंदोलन सुरू झाले आहे. दुधाचे दर २४ रुपये लिटरपर्यंत खाली आणल्याने उत्पादकांचे नुकसान होत असल्याचे सांगत आडगाव (बु.) येथे आंदोलकांनी दूध रस्त्यावर ओतून देत सरकारच्या विरोधात घोषणा दिल्या आणि दुधाचे दर ४० रुपये लिटरपर्यंत वाढवून द्यावेत, अशी मागणी केली. यंदा राज्यात अपेक्षित पाऊस झाला नाही, परतीच्या पावसानेही दगा दिला. त्यामुळे शेतकरी अनंत अडचणींच्या कचाट्यात सापडला आहे. त्यातून त्याची सुटका कशी होणार हा या घडीचा सर्वांत मोठा प्रश्न आहे.

# भारतीय संविधान : देशाची मूल्याधिष्ठित ओळख!

भारत म्हणजे जगातील एक शक्तिशाली लोकशाही गणराज्य! आज आपण स्वातंत्र्याची पंचाहत्तरी ओलांडून पुढे आलो असून मोठ्या सन्मानाने शतकाकडे वाटचाल सुरू झाली आहे! या देदीप्यमान वाटचालीत भारतीय संविधानाचे मूलगामी योगदान असून ते सर्वकाळ केंद्रस्थानी आहे! कोणत्याही देशाचे संविधान हेच त्या त्या देशाचे बलस्थान, गौरवस्थान असते आणि असायलाच हवे! त्याच्या आधारेच देश चालत असतो. या संबंधाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या अनेक बाबींचा ऊहापोह केला जात असताना विशेषत्वाने भारतीय संविधानाचा विचार सर्वच पातळ्यांवर विद्वज्जन करताहेत ही मोठी गौरवपूर्ण बाब आहे! कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाचा डोलारा सक्षमपणे उभा आहे. त्या संविधानाकडे आपण सर्वांनीच मोठ्या जबाबदारीने पहायला हवे!भारतीय संविधान समजून घेण्यापूर्वी आपल्याला या संविधानाची महत्त्वपूर्ण मूल्ये समजून घ्यावी लागतील. संविधानाचा एक-एक भाग मूलगामी आणि दूरगामी विचारपूर्वक लिहिला असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली संपूर्ण प्रज्ञा, प्रतिभा आणि वैश्विक तत्त्वज्ञान याचा अत्यंत विवेक-विचारशील सामर्थ्याने विचार करून जगातील जवळपास ६० राज्यघटनांचा सखोल अभ्यास, चिंतन, मनन करून त्या राज्यघटनेतील जी सारतत्त्वे अथवा मूल्ये भारतीय सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, भौगोलिक, आर्थिक आणि सैद्धांतिक परिप्रेक्ष्यात दूरगामी प्रभाव दर्शवतील तीच तत्त्वे संविधानात समाविष्ट केली आहेत. भारतीय संविधान केवळ एक ग्रंथ नाही, तो केवळ एक कागदी दस्तऐवज नसून भारतीयांना मूलभूत-आनंदी जीवन व्यतीत करण्याचा देशधर्म ग्रंथ आहे! कोणत्याही देशाचे संविधान हेच त्या देशाचे हृदय असते. देशातील तमाम घटकांची सर्वोच्च, सर्वांगीण उत्कर्षाची मूल्ये समोर ठेवूनच त्याची निर्मिती होणे अपेक्षित असते आणि भारतीय संविधान त्या अपेक्षेला तंतोतंत उतरले आहे. भारतीय संविधान हे केवळ लोकशाही, अधिकार, कर्तव्ये अंतर्भूत असलेले पुस्तक नसून तात्त्विकदृष्ट्या इथल्या शेवटच्या घटकाची सर्वांगीण काळजी वाहणारा तो एक मूलगामी तत्त्वज्ञ ग्रंथ आहे! भारतीय संविधानाचे मूल्याधिष्ठित तत्त्वज्ञान समजून घेताना जपानच्या राज्यघटनेची 'आम्ही जपानचे लोक, सर्वकाळ शांती आणि आदर्श मानवी संबंध या सद्सद्विवेकाने राज्यघटना स्वीकारत आहोत' ही उद्देशपत्रिका वाचल्यास भारतीय संविधानाची उंची आणि खोली सहजच लक्षात येईल!संविधान देशाच्या शासन व्यवस्थेचा आरसा असते. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका संविधानाचा आत्मा आहे. भारतीय संविधानाचे मूल्याधिष्ठित तत्त्वज्ञान अभ्यासताना शिल्पकारांनी केवळ स्वातंत्र्य हा एकच उद्देश न ठेवता आपल्या देशात 'उदारमतवादी, लोकशाहीवादी, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता' इत्यादी सर्वोच्च तत्त्वे समोर ठेवून हे संघराज्य तमाम समुदायासाठी मानवी मूल्ये, धार्मिक आणि भाषिक गरजा, ऐतिहासिकदृष्ट्या वंचित-उपेक्षित घटकांविषयी संवेदनशीलता इत्यादी बाबी महत्त्वपूर्ण मानून देशाला एक समान राष्ट्रीय ओळख निर्माण व्हावी' हे तत्त्वज्ञान रुजविण्याचे महत्कार्य केले आहे. देश चालविण्यासाठी संविधान सर्वकाल पंचाच्या भूमिकेत असते. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, शांतता आणि राष्ट्रीय एकात्मता या मूलभूत तत्त्वज्ञानावर आपल्या संविधानाची तात्त्विक उभारणी झाली आहे याचा मागील ७३ वर्षांत देशाला प्रत्यय आला आहे.भारतीय संविधानाचा सरनामा म्हणजे संक्षिप्त राज्यघटनाच! संविधानाचे अंतिम साध्य काय आहे(?) याची उत्तरे आपल्याला संविधानाच्या सरनाम्यात मिळतात. सरनामा हा आपल्या संविधानाचा नकाशा असून त्यात भारतीय लोकशाहीच्या चतु:सीमा दृगोच्चर




होतात. 'आम्ही भारतीय लोक' या सर्वनामयुक्त कर्त्याने राज्यघटनेचा प्रारंभ होतो. इथेच भारतीय राज्यघटनेची सर्वसमावेशकता स्पष्ट होते. भारतीय राज्यघटना सर्व भारतीयांना एका रेषेत आणून बसवते. त्यानंतर 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक' आणि 'न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता' हे सर्वच शब्द वाचताना अंतर्मुख करतात. हे ९ शब्द म्हणजे भारतीय राज्यघटनेचे मूलभूत मूल्याधिष्ठित तत्त्वज्ञान आहे. सार्वभौमत्व म्हणजेच जगण्याची अंतर्बा मूल्ये अधोरेखित होतात. समाजवादी हा शब्द ४२व्या घटनादुरुस्तीने समाविष्ट झाला असून याद्वारे संविधान नागरिकांना सामाजिक धोक्यापासून संरक्षण देते. धर्मनिरपेक्षता अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्व असून 'देश कोणताही धर्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ याचे उदात्तीकरण करत नाही' हे लक्षात घेणे आवश्यक आहे. भारताने संसदीय लोकशाही स्वीकारली असून स्वतंत्र कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ याद्वारे देश चालतो आहे.प्रजासत्ताक लोकशाही म्हणजे मतदानाद्वारे लोक आपले प्रतिनिधी संसदेत पाठवून त्यांच्याद्वारे भारतीय संसद संपूर्ण देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. सर्व भारतीयांना समान न्याय असून विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना स्वातंत्र्य हा भारतीय लोकशाहीचा श्वास आहे. त्याचबरोबर दर्जा आणि संधीची समानता आणि 'वसुधैव कुटुम्बकम्' म्हणजेच विश्वबंधुता ही महत्त्वपूर्ण तत्त्वे अंतर्भूत असून याद्वारे देशातील कोणत्याही नागरिकाचा जात-धर्म-पंथ-लिंग याद्वारे भेदभाव करणे कायद्याने गुन्हा आहे. हे नऊ शब्द म्हणजेच या नऊ तत्त्वांवर संपूर्ण राज्यघटनेचे मूलगामी तत्त्वज्ञान अवलंबून असून संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवस शारीरिक व्याधींचा कसलाही विचार न करता हे संविधान निर्माण केले. संविधानाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान म्हणजे भारतीय स्वातंत्र्याएवढेच अनमोल आहे! भारतीय संविधानातील वरील मूलभूत नऊ तत्त्वांचा विचार करता, या संदर्भाने वर्तमानात मोठ्या प्रमाणावर लोकजागृती होणे अत्यावश्यक वाटते. आज आपण जागे होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कोणत्याही देशाचे भवितव्य तिथल्या तरुणांच्या हाती असते. तरुणांच्या ओठांवरील गाण्यावरून त्या देशाचे भवितव्य ठरते. तेव्हा आज तरुणांनीच या नऊ तत्त्वांचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात करून स्वातंत्र्य-समता-बंधुता-धर्मनिरपेक्षता या मूलभूत लोकशाही तत्त्वांची जपणूक करावी लागेल. कुठेही धर्म-पंथ-लिंग या बाबतीत कट्टरता प्रदर्शित होता कामा नये. कट्टरता प्रसारित झाल्यास देशातील लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना प्रसारित होऊन स्वातंत्र्य-समता-बंधुता धोक्यात येऊ शकते. आपले वर्तन इतरांना त्रासदायक होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच आज मीडिया हे दुधारी शस्त्र असून त्याचा मोठ्या जबाबदारीने वापर करावा लागेल. त्याचबरोबर आपल्या राष्ट्रीय महापुरुषांच्या जीवन आणि विचारांची जपणूक करणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी भारतीय संसदेमध्ये देशाच्या सन्माननीय पंतप्रधानांनी भाषण करताना वारंवार देशाच्या वरील नऊ तत्त्वांचा उल्लेख करून देशासाठी कार्यरत राहावे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, ते देशाच्या संसदीय लोकशाहीला जबाबदार असून त्या सरकारने भारतीय संविधानाच्या मूलभूत, मूल्याधिष्ठित तत्त्वज्ञानाचे दरवर्षी संसदेत सार्वजनिक वाचन केले पाहिजे. संसदीय लोकशाही देशामध्ये रुजताना राष्ट्रहित-समाजहित समोर ठेवून स्वातंत्र्य-समता-बंधुता अबाधित राहणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर सरकारने शिक्षण, आरोग्य यावर लक्ष केंद्रित करून वाढती महागाई, बेरोजगारी संबंधाने पावले उचलून विविध आस्थापनांचे कंत्राटीकरण आणि खाजगीकरण थांबवले पाहिजे. तसेच सर्वत्र मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधीतून तरुणांना कामाला लावल्यास आपला देश मोठ्या दिमाखात स्वातंत्र्याची शंभरी साजरी करेल यात तिळमात्र शंका नाही!

जय संविधान!

**************

-प्रा. डॉ. विठ्ठल खंडुजी जायभाये
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
मोबा. : ९१५८० ६४०६८

# पडदा पडला!

देशाच्या स्वातंत्र्यापासून व फाळणीपासून ठसठसत असलेल्या व प्रचंड चिघळलेल्या वादग्रस्त मुद्यावर म्हणजेच जम्मू-काश्मीर भारताचा इतर राज्यांप्रमाणेच अविभाज्य भूभाग असण्यावर सोमवारी सर्वोच्च न्यायालयाची सर्वोच्च व नि:संदिग्ध मोहर उमटल्याने आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत एका मोठ्या वादावर कायमचा पडदा पडला आहे. ३७० कलम रद्द करण्याचा सरकारचा निर्णय व त्याला राष्ट्रपतींनी दिलेली मंजुरी या दोन्ही बाबी घटनात्मकदृष्ट्या वैधच असल्याचे स्पष्ट करून सर्वोच्च न्यायालयाने भारत हे सार्वभौम व एकात्म प्रजासत्ताक आहे यावर सर्वोच्च मोहर उमटवली आहे. जम्मू-काश्मीरसाठीचे ३७० कलम हे तात्पुरते होते व ते रद्द करण्यात काहीही गैर नाही हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. १९४९ मध्ये महाराजा हरिसिंह यांनी केलेली घोषणा व त्यानंतरचे संविधान जम्मू-काश्मीर स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग असल्याचे तथ्य सिद्ध करतात व हे घटनेच्या कलम १ नुसार स्पष्ट होते, हे न्यायालयाने आपल्या निकालपत्रात अत्यंत सुस्पष्टपणे नमूद केले असल्याने आता फुटीरतावादी व त्यांना बळ देणारे पाकिस्तानी राजकारणी व लष्कर यांनी दीर्घकाळापासून निर्माण केलेल्या संभ्रमाला कुठेही थारा राहिलेला नाही. संविधान सभेची शिफारस ही राष्ट्रपतींसाठी बंधनकारक नव्हतीच.त्यामुळे या सभेचे अस्तित्व संपुष्टात आले तेव्हा ज्या विशेष दर्जासाठी कलम ३७० लावण्यात आले होते त्याचे अस्तित्वदेखील संपुष्टात आले होते, असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे सतत जम्मू-काश्मीरच्या स्वातंत्र्याच्या मुद्याचे तुणतुणे वाजवणा-या फुटीरतावाद्यांना व भारतद्वेषापोटी त्याला बळ देऊन हा वाद आंतरराष्ट्रीय पातळीवर दीर्घकाळ चिघळत ठेवण्याचा प्रयत्न करणा-या पाकिस्तानला हा निकाल म्हणजे जोरदार चपराकच आहे! ३७० कलमाची त्यावेळची गरज, त्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी, सध्याचे वास्तव तसेच हे कलम रद्द करताना केंद्र सरकारने अवलंबिलेली पद्धत, त्या पद्धतीची वैधता याबाबत सर्वोच्च न्यायालयाने नि:संदिग्ध निकाल दिला आहे. शिवाय राज्यघटनेच्या दृष्टीने सर्व राज्ये एकसारखी व सर्वांचे सार्वभौमत्व तितकेच एकसारखे असण्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्पष्ट मोहर उमटवली आहे. विशेष म्हणजे हा निकाल पाचही न्यायाधीशांनी एकमताने दिला आहे. त्यामुळे या निकालावर वेगळा राग आळवणा-यांनी ही बाब लक्षात घेतली पाहिजे. ३७०कलम रद्द करण्याच्या व जम्मू-काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्याच्या निर्णयाविरोधात एकूण २३ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. त्या सर्व याचिकांवर सविस्तर सुनावणी झाल्यावर त्या सर्व याचिका सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने फेटाळून लावल्या आहेत.काही वेगळ्या मुद्यांसहित मुख्य निकालपत्राबरोबर इतर दोन निकालपत्र असली तरी जम्मू-काश्मीरला पुन्हा विशेष राज्याचा दर्जा दिला जाऊ शकत नाही आणि ३७० कलम रद्द करण्याचा सरकार, संसद व राष्ट्रपतींचा निर्णय कुठल्याही प्रकारे घटनात्मक बाबींचे उल्लंघन करणारा नाही, यावर सर्व न्यायमूर्तींचे निकालात एकमत झाले आहे, ही बाब लक्षात घेता




आता देशातील प्रत्येकाने कुठलीही खळखळ न करता हा सर्वोच्च निर्णय मनोमन स्वीकारायला हवा. मात्र, आपल्या देशात कुठलाही मुद्दा हा तत्परतेने राजकारणाचा मुद्दा बनतो. मग त्याला देशाचे सार्वभौमत्व व एकात्मताही अपवाद ठरत नाही. त्यामुळे न्यायालयाचा निकाल आपण घेतलेल्या राजकीय भूमिकेचा विजय वा पराजय याच दृष्टीने घेऊन त्यावर समर्थन अथवा विरोधाची मते मांडली जातात. या गदारोळात देशाच्या सार्वभौमत्व, एकात्मता व अखंडतेचा मुद्दाच अडगळीत टाकला जातो. जम्मू-काश्मीरबाबत मागची अनेक वर्षे हेच घडले आणि त्याचाच फायदा फुटिरतावाद्यांनी व पाकिस्तानने उचलला व पृथ्वीवरील स्वर्ग मानल्या जाणा-या या राज्यात हिंसाचार, दहशतवाद व रक्तपात घडवून या स्वर्गाचा नरक करून टाकला होता.अशा परिस्थितीत ३७० कलम व विशेष राज्याचा दर्जा याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा नि:संदिग्ध, सुस्पष्ट व एकमताने निर्णय होणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. या निर्णयाचा बोध घेऊन आता राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय अजेंडा अथवा भूमिकांना कुरवाळण्याचे सोडून देशाच्या एकात्मतेला, सर्वाभौमत्वाला व अखंडत्वाला प्राधान्य द्यायला हवे. फुटीरतावाद्यांच्या कारवायांनी नरक बनलेले हे राज्य व या राज्यातील सामान्य जनतेचे जगणे स्वर्ग बनले नाही तरी इतर राज्यातील जनतेप्रमाणे किमान सुस कसे बनेल यासाठी आता सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. हाच सर्वांचा 'राष्ट्रधर्म' आहे. त्याचीच आठवण सर्वोच्च न्यायालयानेच आपल्या याच निर्णयात करून दिली आहे. या राज्यातील जनतेत आपण भारताचेच नागरिक आहोत हा विश्वास निर्माण होण्यासाठी व तो विश्वास जोपासला जाण्यासाठी तेथे लोकशाही प्रक्रिया खोलवर रुजली पाहिजे. ही प्रक्रिया रुजविण्यासाठीचे पहिले पाऊल म्हणजे या राज्याला संपूर्ण राज्याचा दर्जा बहाल करून तेथे निवडणुका घेतल्या पाहिजेत. केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ ला ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय घेतला. जम्मू-काश्मीरचे विभाजन करून लेह-लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जाही देण्यात आला. जम्मू-काश्मीरमध्ये मतदारसंघ पुनर्रचनाही पार पडली. मात्र, हे सगळे ज्यासाठी ती राज्याची विधानसभा निवडणूक पाच वर्षे उलटून गेल्यावरही होत नाही.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात त्यावर नेमके बोट ठेवून ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत राज्यात विधानसभा निवडणूक घ्या, असा स्पष्ट आदेश केंद्र सरकारला न देता थेट निवडणूक आयोगालाच दिला. त्यातून सर्वोच्च न्यायालयास काय अपेक्षित आहे हे सर्व राजकीय पक्षांच्या व जनतेच्याही लक्षात यावे, ही अपेक्षा! केवळ जम्मू-काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याच्या गर्जना केल्याने काहीही साध्य होणार नाही. तो खरोखर देशाचा अविभाज्य भाग तेव्हाच बनेल जेव्हा या राज्यातील जनतेची मनोमन तशी भावना होईल. ही भावना आपोआप निर्माण होणार नाही. त्यासाठी या राज्यातील जनतेच्या मनात भारताबाबत 'आपला देश' हा विश्वास निर्माण व्हायला हवा. तो निर्माण करण्यासाठी तेथे शांतता स्थापित करण्याचे व लोकशाही प्रक्रिया रुजविण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर व्हायला हवेत. या प्रयत्नांचा एक प्रमुख भाग म्हणजे या राज्यात निवडणूक घेणे व राज्यातील जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती या राज्याचा कारभार सोपवणे. त्यांना राज्याच्या विकासासाठी, प्रगतीसाठी करावयाच्या प्रयत्नात मनापासून मदत करणे. मनाजोगता निकाल आल्यावर तरी विद्यमान केंद्र सरकार हे करेल, हीच अपेक्षा!

# जेवल्यावर ‘या’ पेक्षा जास्त पावलं अजिबात चालू नये! तज्ज्ञांनी सांगितलेला ‘आयुर्वेदिक नियम’ समजून घेऊया

अर्ली फूड्सच्या संस्थापक शालिनी संतोष कुमार सांगतात, मला अजूनही आठवतं की दुपारचं जेवण किंवा रात्रीचं जेवण झाल्यावर मी माझ्या ऑफिसमध्ये किंवा घरी असतानाही ३० मिनिटे चालायचे. पण त्यामुळे.. जेवणानंतर थेट अंथरुणावर पडू नये थोडं का होईना चालावं हा सल्ला अनेक आरोग्य तज्ज्ञ देतात. पण नेमकं किती चालावं हे माहीत असणे सुद्धा अत्यंत आवश्यक आहे. जेवल्यावर शतपावली करावी हा सल्ला आपणही ऐकून असाल पण ‘अति तिथे माती’ हा नियम या सल्ल्याला सुद्धा लागू होतो. अर्ली फूड्सच्या संस्थापक शालिनी संतोष कुमार, यांच्या एका पोस्टमध्ये सुद्धा ही बाब अधोरेखित करण्यात आली आहे. त्या म्हणतात, कोणतीच गोष्ट जास्त करू नका. मला अजूनही आठवतं की दुपारचं जेवण किंवा रात्रीचं जेवण झाल्यावर मी माझ्या ऑफिसमध्ये किंवा घरी असतानाही ३० मिनिटे चालायचे. हे केवळ थकवणारेच नव्हते तर आता माझ्या लक्षात आले आहे की अन्न देखील नीट पचले नाही कारण सर्व रक्त प्रवाह आणि ऊर्जा पोटावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी पाय आणि हातांना दिली जाते.शालिनी यांनी आपल्या या अनुभवाविषयी आयुर्वेदिक सविस्तर माहिती मिळवली आणि त्यानुसार त्यांनी पोस्टमध्ये माहिती दिली की, साधे वज्रासन किंवा १०० पावले चालणे पचनासाठी पुरेसे आहे. काहीजण कधी कधी तासभर चालतात. पण हा केवळ जागरूकतेचा अभाव आहे. अगदी लहान मुलांना सुद्धा जेवणानंतर खेळायला किंवा जास्त उड्या मारायला देऊ नका. त्यांना वाटल्यास बैठे खेळ खेळायला द्या,



लिहायला, वाचायला द्या, अगदी सोप्या व साध्या हालचाली करणे पुरेसे ठरेल. जेवल्यानंतर शंभरच पावले का चालावे?शिल्लिम येथील ‘धारणा’ संस्थेचे आरोग्य संचालक डॉ अरुण पिल्लई यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, ‘चरक संहिता’ सुत्रानुसार जेवणानंतर शतपावली १०० (शत) पावले (पावली) चालण्याची शिफारस केली जाते. पाश्चात्य जगातही ‘थर्मल वॉक’ म्हणून ही पद्धत प्रचलित आहे. आयुर्वेदात १०० हा क्रमांक महत्त्वाचा आहे कारण मानवी वय नेहमीच शतायु (१०० वर्षे) म्हणून मोजले जात होते. अन्नाच्या चयापचयासाठी जबाबदार असलेल्या जठारग्नीला सक्रिय करण्यासाठी १०० पावले चालणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.डॉ पिल्लई यांच्या मते, जेवणानंतर थोडे चालल्याने पचन आणि मूड सुधारण्यास मदत होते, सूज येणे, जठराची सूज आणि ग्लुकोजची पातळी कमी होते तसेच अन्नातील पोषण सुद्धा शरीरात चांगल्या पद्धतीने शोषण्यास मदत होते. त्यामुळे पुढच्या वेळी जेवल्यावर चालताना फायदे, व योग्य पद्धत नक्की लक्षात घ्या.

## रोज गाजर खाल्ल्यास शरीरात वाढलेले कोलेस्ट्रॉल, रक्तातील साखर अन् वजन झटक्यात कमी होईल? तज्ज्ञांकडून जाणून घ्या उत्तर




गाजराचे अनेक फायदे आहेत. अनेक पोषक घटकांसह अ जीवनसत्त्वानं परिपूर्ण असलेलं गाजर थंडीच्या दिवसांमध्ये तरी नक्की खावं, असा सल्ला नेहमी दिला जातो. आहाराचा आपल्या संपूर्ण आरोग्यावर चांगला अथवा वाईट परिणाम होत असतो. त्यासाठीच आहारात जाणीवपूर्वक आरोग्यदायी गोष्टींचा समावेश असणं गरजेचं आहे. थंडीमध्ये बाजारात अगदी सहज उपलब्ध होणारं कंदमूळ म्हणजे गाजर (उर्रीीं). बीटा कॅरोटीनचं प्रमाण गाजरामध्ये अधिक असतं. हे कंदमूळ आपण सॅलड, भाजी, पुडिंग किंवा ज्यूसच्या स्वरूपात खाऊ शकतो. गाजर आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. गाजर अनेक रोगांसाठी एक चांगलं औषध आहे, असं म्हटलं जातं.

## मिलेट सेंटर सोलापूरमध्ये उभारण्यात यावे

सोलापूर : सोलापूर येथील श्री अन्न उत्कृष्टता केंद्र बारामती येथे हलविण्याचा शासकीय निर्णय जाहीर झाल्यानंतर राजीनामा देण्याचा इशारा देणारे भाजप आमदार सुभाष देशमुख यांनी हा मुद्दा आज विधानसभेत उपस्थित केला. बारामतीला जास्तीचा निधी द्या; पण मिलेट सेंटर सोलापूरमध्ये उभारण्यात यावे, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.कॉँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांनीही मिलेट सेंटरबाबत प्रश्न मांडला. हे केंद्र सोलापूरहून बारामतीला पळविण्यामागचे कारण आम्हाला अजून समजलेले नाही. ही चुकीची प्रथा असून सरकारने हे केंद्र सोलापूरमध्ये स्थापन करावे, अशी माझी हात जोडून विनंती आहे, अशी भावना आमदार शिंदे यांनी मांडली.सोलापूर येथील श्री अन्न उत्कृष्टता केंद्र बारामतीला हलविण्याचे शासकीय परिपत्रक नोव्हेंबरमध्ये निघाले होते. त्यावेळी जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. त्या वेळी देशमुख यांनी हे केंद्र बाहेर जाणार असेल तर आपण आमदारकीचा राजीनामा देऊ, असा इशारा दिला होता. तोच प्रश्न आज आमदार देशमुख यांनी विधानसभेत मांडला.माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख म्हणाले की, सोलापूर येथील श्री अन्न उत्कृष्टता केंद्र बारामती येथे स्थापन करण्याबाबतचे शासकीय परित्रपक नोव्हेंबरमध्ये निघाले आहे. त्यानंतर श्री अन्न उत्कृष्टता केंद्र जाणार नाही, तर केवळ प्रशिक्षण केंद्र बारामतीला जाणार आहे, अशी चर्चा झाली. पण परिपत्रकामध्ये प्रशिक्षण केंद्र असा उल्लेख नाही. श्री. अन्न उत्कृष्टता केंद्र सोलापूरऐवजी बारामती येथे स्थापन करावे, असे परिपत्रकामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, अजितदादा हे राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. ते बारामती विधानसभेचे सदस्य नक्की आहेत. बारामती मतदारसंघासाठी जास्तीत जास्त निधी द्यावा, योजना राबवा. पण, सोलापूरचे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र हे सोलापूरमध्ये व्हायला पाहिजे. सरकारने हे



परिपत्रक रद्द करून ते केंद्र सोलापूरमध्ये स्थापन करावे, अशी मागणी देशमुख यांनी केली.आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात सोलापूरला श्री अन्न उत्कृष्टता केंद्र (मिलेट सेंटर) जाहीर केले होते. पण काही दिवसांपूर्वी शासकीय परिपत्रक निघाले की, हे अन्न उत्कृष्टता केंद्र सोलापूरहून बारामती येथे हलविण्यात येणार आहे. बारामतीला मिलेट सेंटर सुरू करण्याबाबत आमचा विरोध नाही. पण, सोलापूरचं पळवून बारामतीला नेण्यामागचे लॉजिक आम्हाला कळलेले नाही.सोलापूरच्या मिलेट सेंटरमध्ये दोनशे कोटींची गुंतवणूक होणार होती आणि शेकडो हातांना काम मिळणार होते. सोलापूर हा ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जाणारा जिल्हा आहे. अर्थसंकल्पात सोलापूरला मिलेट सेंटर जाहीर करता आणि मध्येच परिपत्रक काढून दुसरीकडे हलवता, ही चुकीची प्रथा सुरू होते आहे. सोलापूरचे श्री अन्न उत्कृष्टता दुसरीकडे कुठेही न हलवता सोलापूरमध्येच करावे, अशी माझी मुख्यमंत्र्यांना हात जोडून विनंती आहे, असे प्रणिती शिंदे यांनी नमूद केले.

## तीन सुधारित विधेयके लोकसभेत सादर; बुधवारी चर्चा

नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा मंगळवारी सातवा दिवस आहे. दरम्यान, संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितले की, तीन नवीन गुन्हेगारी विधेयके मंगळवारी संसदेत मांडण्यात आली आहेत. स्थायी समितीच्या शिफारशींनंतर तिन्ही विधेयकांमध्ये बदल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तीन सुधारित विधेयके लोकसभेत सादर केली. यामध्ये भारतीय न्याय (द्वितीय) संहिता २०२३, भारतीय पुरावा (द्वितीय) विधेयक २०२३ आणि भारतीय नागरी संरक्षण (द्वितीय) संहिता २०२३ यांचा समावेश आहे.१४ डिसेंबरला या विधेयकावर चर्चा होईल आणि १५ डिसेंबरच्या चर्चेत उत्तर दिले जाईल, असे गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले. विशेष म्हणजे नियमित प्रक्रियेनुसार नवीन सुधारणांसह नवीन विधेयके मांडण्यासाठी पूर्वीची विधेयके मागे घेण्यात आली आहेत. तसेच जम्मू-काश्मीर आणि पुद्दुचेरीमध्ये महिला आरक्षण विधेयकाची




अंमलबजावणी करणारी विधेयके लोकसभेत मांडण्यात आली आहेत. केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (दुसरी दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश (दुरुस्ती) विधेयक लोकसभेत सादर केले. महिला आरक्षण विधेयकांतर्गत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राज्यसभेतही सादर मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती आणि सेवाशर्ती) विधेयक राज्यसभेत सादर करण्यात आले आहे. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी हे विधेयक सभागृहात मांडले.

## डीके शिवकुमार आणि तुम्ही मिळालेले आहात

नवी दिल्ली : संसदेच्या कनिष्ठ सभागृहात आज विचित्र प्रसंग पहायला मिळाला. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांनी काँग्रेसचे चाणक्य मानले जाणारे कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यावर टीका केली. भाजपा खासदार सुशील कुमार मोदी यांनी खर्गेंना कर्नाटकातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील जात जनगणनेवरून असलेल्या मतभेदांवर छेडले होते.जम्मू काश्मीरवरील दोन विधेयकांवरील चर्चे वेळी मोदींनी खर्गेंना डीके शिवकुमारांचे नाव घेऊन प्रश्न विचारला होता. तुमचे सरकार जाती सर्वेक्षणाचा अहवाल कधी जाहीर करणार असा सवाल मोदी यांनी विचारला होता. उपमुख्यमंत्र्यांनी तर रिपोर्ट पब्लिक न करण्यावर एक याचिका सही करून ठेवली आहे, असे विचारले होते. यावर खर्गे यांनी म्हटले की शिवकुमार आणि भाजपा दोन्ही जाती जनगणनेच्या रिपोर्टविरोधात आहेत. दोन्ही विरोध करत आहात. दोघेही या प्रश्नावर एक झाला आहात. हे जातीचे चरित्र आहे. तुम्ही मोठ्या जातीचे लोक मिळालेले आहात, असा आरोप केला.सिद्धरामय्या यांना जातीवर आधारित जनगणना अहवाल जारी करायचा आहे. केवळ अंदाजाच्या आधारे विरोध करू नका. विरोध करणा-यांना याची माहिती नाही असे मुख्यमंत्री म्हणाले होते. तर डीके यांनी विविध समुदायांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मागणीचा विचार करण्यात यावा असे सांगत जात जनगणना अहवाल स्वीकारण्यात येऊ नये अशा निवेदनावर स्वाक्षरीही केली होती. कर्नाटकातही आरक्षणावरून वातावरण तापू लागले असून वोक्कालिगा आणि लिंगायत समुदायांनी जात अहवालाला उघड विरोध केला आहे. हा अहवाल फेटाळण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू झाले आहे.

## परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी इस्रायलच्या परराष्ट्रमंत्र्यांशी केली चर्चा

नवी दिल्ली : इस्रायल आणि हमास यांच्यात भयंकर युद्ध सुरू आहे. इस्त्रायली सैन्य गाझामधील हमासच्या स्थानांना लक्ष्य करत आहे. यामुळे नागरिकांनाही मोठी हानी पोहचली आहे. दोन्ही पक्षांमध्ये सुरू असलेल्या युद्धाबाबत आंतरराष्ट्रीय मंचांवर सातत्याने टीका होत आहे. एकीकडे रशिया आणि युक्रेनमधील युद्धातून जग सावरू शकले नाही, तर दुसरीकडे हमास आणि इस्रायलमध्ये युद्ध सुरू झाले. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी इस्रायलचे परराष्ट्र मंत्री एली कोहेन यांच्याशी चर्चा केली आहे. चर्चेदरम्यान गाझा, लेबनॉनमधील सद्यस्थिती आणि या भागातील सागरी वाहतुकीच्या सुरक्षेवर चर्चा झाली. यावेळी परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही संपर्कात राहू. एस जयशंकर यांनी सोशल मीडियावर संभाषणाशी संबंधित एक पोस्ट शेअर केली आहे.इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये सुमारे १८,००० पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला आहे. युनायटेड नेशन्सचा अंदाज आहे



की गाझाच्या २.४ दशलक्ष लोकांपैकी १.९ दशलक्ष लोक त्यांच्या घरातून विस्थापित झाले आहेत, त्यापैकी निम्मी मुले आहेत. हमास आणि इस्रायल यांच्यातील युद्ध सुरू होऊन ६५ दिवस उलटले आहेत, मात्र सध्या तरी युद्ध संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. सोमवारी समोर आलेल्या इस्रायली मीडियाच्या वृत्तानुसार, दक्षिण गाझा पट्टीमध्ये झालेल्या लढाईत इस्रायली लष्कराचे आणखी तीन सैनिक मरण पावले आहेत. यामुळे हमासविरुद्धच्या जमिनीवरील हल्ल्यात मारल्या गेलेल्या सैनिकांची संख्या १०४ वर पोहोचली आहे.

## एआय सोबत अतिशय काळजीपूर्वक पुढे जावे लागेल : पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी दिल्लीत झालेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शिखर परिषदेत ग्लोबल पार्टनरशिपमध्ये भाग घेतला. आपल्या भाषणात ते म्हणाले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये (एआय) तंत्रज्ञानात बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. एआय वर्तमान आणि भावी पिढ्यांवर परिणाम करत आहे. एआय सोबत आपल्याला अतिशय काळजीपूर्वक पुढे जावे लागेल, असे ते म्हणाले.पंतप्रधान म्हणाले की, याबाबतीत आपण अधिक सावधगिरीने पुढे जावे. मला विश्वास आहे की दिल्लीत आयोजित या कार्यक्रमातून अनेक सूचना आणि कल्पना



समोर येतील, ज्यामुळे आम्हाला मदत होईल. तसेच एआमुळे उद्भवणाऱ्या संभाव्य धोके आणि आव्हानांपासून आम्ही जगाचे रक्षण करू असे सांगितले.ते म्हणाले की, एआय हे २१व्या शतकातील विकासाचे सर्वात मोठे साधन बनू शकते आणि २१व्या शतकाला उद्ध्वस्त करण्यातही सर्वात मोठी भूमिका बजावू शकते. डीप फेकचे आव्हान संपूर्ण जगासमोर आहे, याशिवाय सायबर सुरक्षा, डेटा चोरी आणि एआय टूल्स दहशतवाद्यांच्या हाती येण्याचाही मोठा धोका आहे.


नरेंद्र मोदी म्हणाले की, एआयचा विकास-प्रवास जितका सर्वसमावेशक असेल तितके चांगले परिणाम समाजाला मिळतील. गेल्या दशकांपासून तंत्रज्ञानाच्या प्रवेशामध्ये असमानता होती, आता आपण समाजाचे अशा प्रकारच्या हानीपासून संरक्षण केले पाहिजे. जेव्हा लोकशाही मूल्ये तंत्रज्ञानाशी जोडली जातात, तेव्हा ते सर्वसमावेशकतेसाठी गुणक म्हणून कार्य करते.

## रशियाने लागू केली प्रवासबंदी

मॉस्को : रशियाने आपल्या नागरिकांवर संपूर्ण प्रवास बंदी लादली आहे. व्लादिमीर पुतिन प्रशासन विशेष गटातील लोकांचे पासपोर्ट जप्त करत आहे. त्यांना त्यांचा पासपोर्ट पाच दिवसांत सरकारला जमा करावा लागणार आहे. रशियात पुढील वर्षी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका होणार असून व्लादिमीर पुतीन पाचव्यांदा सत्तेच्या शर्यतीत आहेत. पुतिन आपल्या विरोधकांचा आवाज दडपण्यासाठी या गोष्टी करत असल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या विरोधकांनी या निर्णयानंतर त्यांच्यावर हा आरोप लावला आहे.रशियन कायद्यानुसार, फेडरल सिक्युरिटी सर्व्हिसचे अधिकारी, कर्मचारी, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले व्यक्ती किंवा देशातील गुपिते किंवा विशेष बाबींची माहिती असलेल्या किंवा त्यासंदर्भातील कामकाज पाहणा-या लोकांचा या गटात समावेश असणार आहे. आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे की, पासपोर्ट परराष्ट्र मंत्रालय किंवा गृह मंत्रालयाकडे जमा करावा लागेल. त्यांचा पासपोर्ट नीट ठेवला जाईल. तसेच लोकांना त्यांचे पासपोर्ट जारी केलेल्या पासपोर्ट कार्यालयात जमा करण्यास सांगितले आहे.

पासपोर्ट परत केव्हा मिळणार?

संबंधित नागरिकांवरील प्रवास बंदी उठल्यानंतर त्यांचे पासपोर्ट परत करता येतील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. लष्करी नागरिकांवरही विशेष पहारा ठेवला जाणार आहे. उदाहरणार्थ, ज्या लोकांचा प्रवास करण्याचा अधिकार लष्करी



किंवा नागरी सेवेच्या आधारावर आहे, त्यांना अतिरिक्तपणे एक लष्करी ओळखपत्र प्रदान केले जाऊ शकेल. त्यावरून ते त्यांची सेवा पार पाडत असल्याचे स्पष्ट होईल.रशियाच्या सर्व नागरिकांवर बंदी असणार नाही या प्रकरणाशी निगडित अज्ञात स्त्रोतांचा हवाला देऊन आधी असे सांगण्यात आले होते की, रशियाच्या सुरक्षा सेवा परदेशात प्रवास टाळण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि राज्य कंपनीच्या अधिका-यांचे पासपोर्ट जप्त करत आहेत. तथापि, हे सर्व रशियन नागरिकांना लागू होणार नाही. हे फक्त अशा लोकांना लागू होईल ज्यांच्याकडे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींची माहिती असेल किंवा ते कोणत्याही प्रकरणात दोषी असतील.

# कांद्यावरील निर्यात बंदी हटवा खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडे आग्रही मागणी

धाराशिव :- केंद्र सरकारने २०१४ साली जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळले असून भारतीय कांद्यास मोठ्या प्रमाणात जागतिक बाजारपेठेमध्ये मागणी आहे भारतामध्ये महाराष्ट्र सह कर्नाटक राजस्थान मध्य प्रदेश आदी राज्यांमध्ये जवळपास ३०० लक्ष टन एवढे कांद्याचे उत्पादन होते त्यापैकी ४० टक्के उत्पादन हे केवळ महाराष्ट्रात होते नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव व लासलगाव तसेच सोलापूर या कांद्याच्या देशांतर्गत सर्वात मोठ्या बाजारपेठा असून लासलगाव ही आशिया खंडातील सर्वात मोठे कांद्याची बाजारपेठ आहे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेस लासलगाव येथून कांदा निर्यात होत असतो यावर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा काढणीस आलेला कांदा हा शेतावरती सडून गेल्यामुळे तसेच बाजारपेठेमध्ये नेणे योग्य कांदा नसल्यामुळे कांद्याचे दर व देशांतर्गत मागणी वाढल्यामुळे कांद्याचे दर वाढलेले आहेत या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाकडून मागील आठवड्यामध्ये कांदा निर्याती वरती ३१ मार्च २०२४ पर्यंत बंदी घालण्यात आली असून भाजप सरकारने हे केवळ लोकसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तसेच काही व्यापारी दबाव गटांच्या मागणी साठी हा निर्णय घेतला असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये दुप्पट वाढ करणारे सरकार फक्त खते व किटकनाशकाच्या दरात वाढ करुन वारंवार शेतकरी विरोधी निर्णय घेऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान करत असल्याचे भावना शेतकऱ्यांमध्ये झालेली आहे या पार्श्वभूमीवर लोकसभेच्या अधिवेशन काळामध्ये धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी वाणिज्य मंत्रालय व वाणिज्य मंत्री माननीय पियुष गोयल यांना पत्राद्वारे कांदा निर्यातीवरील बंदी तात्काळ मागे घेवून महाराष्ट्रातील दुष्काळ व अवकाळी सारख्या नैसर्गिक आपत्तीतून जाणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देणेबाबत विनंती केली आहे.

# आमदार धिरज देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याचे काम सुरू



लातूर : लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे रेणापूर तालुक्यातील पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याचे काम आजपासून सुरू झाले. अनेक दिवस प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने या परिसरातील ग्रामस्थांनी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले. पानगाव ते खरोळा पाटी (राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१क) या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. विविध कारणांमुळे रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे या भागातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी व व्यापाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. या भागात अपघाताचेही प्रमाण वाढले होते. त्यामुळे या रस्त्याचे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज देशमुख हे सातत्याने प्रयत्नशील होते. या रस्त्याच्या कामाला तातडीने मंजुरी मिळण्याबाबत आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांना वेळोवेळी पत्र पाठवले आहे. शिवाय, दिल्लीत जावून त्यांची प्रत्यक्ष भेटही घेतली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशनातसुद्धा त्यांनी याबाबत आवाज उठवला होता. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आणि रस्त्याचे प्रत्यक्ष कामही सुरू झाले आहे. पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याचा प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळ्या अडचणीमुळे हे काम रखडले होते. पण, आता रस्त्याच्या कामाला अखेर सुरवात झाली आहे. ही कामे वेळेत पूर्ण व्हावे, अशा सूचना आम्ही सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, अशी माहिती आमदार श्री. धिरज देशमुख यांनी दिली. तसेच, नागरिकांनीही सदर रस्त्याचे काम पूर्ण होण्याबाबत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# चंद्रकांत (दादा) जगताप उद्योग रत्न पुरस्काराने सन्मानित



नवी मुंबई / के. एच. हनवते :- फुले , शाहू , आंबेडकर विचार प्रसारक मंडळ (भोर) या संस्थेच्या वतीने गेल्या ९ वर्षा पासून राज्यात, देशात, आणि परदेशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करत आहे. आणि अशा सामाजीक धार्मिक व राजकिय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत, अशा व्यक्तीचा उपरोक्त संस्थेच्या वतीने दिनांक १०/१२/२०२३ रोजी. यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्योग रत्न पुरस्कार नवी मुंबईची शान उद्योजक - चंद्रकांत (दादा) जगताप यांना देण्यात अला. त्यावेळी जागतिक दर्जाचे कवी लेखक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते : दामोदर माओजी (गोवा), तसेच ज्येष्ट आंबेडकरी चळवळीतील नेते लेखक साहित्यिक समीक्षक : अर्जुन डांगळे, आमदार संग्राम (दादा) थोपटे, सावित्री माई फुले विद्यापीठाचे डॉ. विजय खैरे, प्रसिद्ध अभिनेते किरण माने, ज्ञानपीठ विद्यापीठाचे प्रा. देशमुख सर, वाडीया महाविद्यालया चे प्राचार्य : वृषाली रणधीर, प्रोफेसर मेघना भोसले आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. रोहिदास जाधव यांच्या उपस्थितीत उद्योग रत्न पुरस्कार सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# शेतकरी नवरा नको गं बाई ; पस्तीशीतही नवरी मिळेना

देवणी : बाळू तिपराळे तुळशीच्या लग्नानंतर आता लग्नांचा धडाका सुरू झाला आहे. आधी मुलींच्या लग्नाचीचिंता असायची, आता मुली मिळत नसल्याने मुलांच्या लग्नाचीचिंता वाढली आहे. अलीकडच्या काळात मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या घटली आहे. याशिवाय मुलींनी शिक्षणातही आघाडी घेतली आहे. त्यामुळे एखाद्या खासगी कंपनीत नोकरी करणारा व शहरात वास्तव्यास असणा-या मुलांना पसंती दर्शवली जात आहे. बहुतांश मुली शेतकरी नवरा नाकारत आहेत.पूर्वी मुला मुलींचे लग्न आई-वडिलांकडून ठरविण्यात येत होते परंतु आता मुलगा व मुलीचे विचारही विचारात घेण्यात येत नव्हते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बहुतेक मुले व मुली स्वत: आपल्या पसंतीच्या मुलांची तर मुले आपल्या पसंतीच्या मुलींची निवड करतात. सध्या मुलीपेक्षा मुलांच्या लग्नाचीचिंता वाढली. पूर्वी मुलीचे लग्न जुळण्यास फार मोठी अडचण येत होती. किंबहुना सहजासहजी मुलगी मिळत होती मात्र आता मुलाला मुलगी मिळेनाशी झाली आहे. आता मुलीची पसंती अधिक महत्वाची ठरली आहे.

# ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी शिवाजी पार्क येथे प्रबुद्ध दिव्यांग फाउंडेशन च्या वतीने मोफत पाणी व बिस्कीट वाटप

नवी मुंबई / के.एच. हनवते :- प्रबुद्ध दिव्यांग फाउंडेशन नवी मुंबई च्या वतीने महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण झाले आणि त्या दिनानिमित्त आपन पण आपल्या समाज बांधवांची सेवा केली पाहीजे या उदात्त भावनेने प्रबुद्ध दिव्यांग फाउंडेशन नवी मुंबई च्या वतीने मोफत पाणी तसे बिस्कीट वाटप करण्यात आले. प्रबुद्ध दिव्यांग फौंडेशनच्या या उपक्रमाला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष : सुवर्णा गजभिये तसेच सहसचिव आतिष शिंदे यांनी अपार मेहनत घेतली आणि आपल्या फाउंडेशनच्या वतीने भविष्यात आपण असे उपक्रम राबवून समाजाची सेवा करण्याचा संकल्प करून महामानावांना विनम्र अभिवादन केले.




# लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना युवानेते ऋषीकेश कराड यांच्याकडून अभिवादन



लातूर दि.१२ - देशाचे माजी ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्राचे लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती १२ डिसेंबर २०२३ मंगळवार रोजी लातूर येथील आ. रमेशअप्पा कराड यांच्या संवाद या भाजपा कार्यालयात युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात स्व. मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशअप्पा कराड यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते व मुंडे साहेब यांच्यावर प्रेम करणार्या सर्व स्तरातील नागरिकांनी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी जिल्हा भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल भिसे, गोविंद नरहरे, रेणापुर तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, पसचे माजी उपसभापती अनंत चव्हाण, रेणापूर संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, सदस्य शरद दरेकर, चंद्रकांत कातळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विजय गंभीरे, भाजपाचे भाऊसाहेब गुळभिले, प्रताप पाटील, गोपाळ शेंडगे, लक्ष्मण नागीमे, आदिनाथ मुळे, दिपक वांगस्कर, भागवत गित्ते, भाजयुमो तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा सुरेखा पुरी, तालुकाध्यक्षा अनुसया फड, ॲड. माधव गुडे, रेणापूरचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष दत्ता सरवदे, तुकाराम केंचे, नामदेव बोंबडे, उज्वल कांबळे, विजय चव्हाण, उत्तम चव्हाण, अशोक सावंत, माधव घुले, भाजयुमोचे संतोष राठोड, कार्तिक गंभीरे, गणेश चव्हाण, रमेश चव्हाण, प्रशांत डोंगरे, ज्ञानेश्वर जुगल, लक्ष्मण खलंग्रे, प्रसाद राठोड, गोविंद कराड, नारायण राठोड, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना एम .आय .डी.सी. भागात सुरु....



लातूर/प्रतिनिधी - शहरातील नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य सुविधा मिळण्यासाठी महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध जागेमध्ये मनपामार्फत नागरी दवाखाने चालू करण्यात येत आहेत . या अंतर्गत दि. ११/१२/२३ रोजी एमआयडीसी भागातील अग्नीशमन कार्यालय परिसरात महापालिकेमार्फत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चालू करण्यात आला. दवाखान्याचे उदघाटन महानगरपालिकेचे आयुक्त श्री.बाबासाहेब मनोहरे यांचे हस्ते करण्यात आले .यावेळी आरोग्य विभागाचे उपायुक्त श्री.रावसाहेब कोळगणे, आरोग्य अधिकारी डॉ. महेश पाटील ,अग्निशमन अधिकारी श्री.सुभाष कदम ,शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रामेश्वर कलवले, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनम पटेल व कर्मचारी उपस्थित होते. या दवाखान्यामुळे एमआयडीसी भागातील कामगार वर्ग व इतर रहिवासी, हुडको भागातील व परिसरातील नागरिक, शासकीय वसाहतीतील नागरिक यांना प्राथमिक आरोग्य सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध होणार आहे. सदरील दवाखाना सुट्टीचे दिवस वगळून दररोज दुपारी २.०० ते रात्री १०.०० वा.पर्यंत चालू राहणार आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# रेणापूर येथे तालुका स्तरीय किशोरी क्रीडा महोत्सव

रेणापूर : प्रतिनिधी ग्रामीण भागातील किशोरी मुलीमध्ये क्रिडा क्षेत्राची आवड नर्मिाण व्हावी आणि क्रिडा क्षेत्रात किशोरी उत्तुंग भरारी मारुन करीअर घडवावे या उद्देशाने क्राय संस्था मुंबई आणि कलापंढरी संस्था पानगाव च्या वतीने दिनांक १० डिसेंबर रोजी रविवारी रेणापूर येथील श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक वद्यिालयाच्या प्रांगणामध्ये तालूका स्तरीय किशोरी क्रिडा महोत्सवाचे आयोजन कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आल्या होत्या.या स्पर्धेचे उद्घाटन श्रीराम माध्यमीक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतिष गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आले. सांस्कृतीक विभागाचे अमृतेश्वर स्वामी, क्रीडा विभागाचे एस एन भातांब्रे, कलापंढरी संस्थेचे सचिव अनिरुद्ध जंगापल्ले, गरज सूर्यवंशी, सविता कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती तर समारोप प्रसंगी प्राचार्य जेष्ठ विचारवंत माधव गादेकर,कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी,संस्था सचिव अनिरुद्ध जंगापल्ले,सविता कुलकर्णी,के वाय पटवेकर,सुजित कुमार गायकवाड,कालीदास गायकवाड यांची उपस्थिती होती. या किशोरी क्रीडा महोत्सवात किशोरी मुलींनी क्रिकेट, कब्बडी, खो-खो आदी खेळ खेळले यात तालूक्यातील पानगाव, बिटरगाव, तळणी ,रेणापूर,तसेच चाकूर तालूक्यातील वडवळ,सेवापूर तांडा येथील किशोरी मुलींनी सहभाग घेतला होता.या मध्ये क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारीतोषीक पानगाव येथील संघाने पटकावले तर द्वितीय क्रमांक तळणी संघाने पटकावले तर कब्बडी मध्ये प्रथम क्रमांकाचे वडवळ,द्वितीय क्रमांकाचे बिटरगाव,




तर उत्तेजनार्थ रेणापूर संघाने पटकावले,तर खोखो स्पर्धेत प्रथम क्रमांक बिटरगाव, व्दितीय तळणी आदी संघाने पारीतोषीक पटकावले, मान्यवरांच्या हस्ते प्रथम ,द्वितीय तृतीय तसेच उत्तेजनार्थ पारीतोषिक विजेत्यां संघाला स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी सहभागी किशोरींनी जिल्हा स्तरीय स्पर्धा घेण्यासाठी मागणी केली. हा क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सुरज सुर्यवंशी,माया ताई सोरटे,मधुकर गालफाडे, प्रतिमा कांबळे, शालूताई साके, सुप्रिया गोरे,फराना शेख,राजेश्री मोटाडे, दिपाली ढाले, संदीप संपत्ते, सुप्रिया रामदासी, विलास दंद्धे, मंगेश बरुडे,अतूल वाकडे, सुरेश हाके,कोमेश कसबे, आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन मधुकर गालफाडे यांनी केले तर आभार सुरज सूर्यवंशी यांनी मानले.

# पत्नीच्या खून प्रकरणी पतीस दहा वर्षाची सक्तमजुरी

शिरूर अनंतपाळ : प्रतिनिधी तालुक्यातील साकोळ येथे तीन वर्षांपूर्वी माहेराहून दुकानासाठी २ लाख रूपये घेऊन यावेत, अशी मागणी करीत पत्नीचा गळा दाबून खुन करणा-या आरोपी पतीस निलंगा न्यायालयाने दहा वर्षांची सक्तमजुरी तसेच पंधरा हजार रूपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. तालुक्यातील साकोळ येथील आकाश विनोद भुजंगा याने तीन वर्षापूर्वी पत्नी शुभांगी हीस माहेरहून दुकानासाठी दोन लाख रूपये घेऊन यावेत अशा प्रकारची मागणी करत गळा दाबून खुन केल्याची घटना घडली होती.याबाबत शिरूर अनंतपाळ पोलीसात कलम ३०४ ब तसेच ४९८ अ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.खटल्याचा तपास शिरूर अनंतपाळ येथील तत्कालीन पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी केला असून त्यांनी तपासात सबळ पुरावा गोळा करून आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.तीन वर्ष निलंगा न्यायालयात या गुन्ह्याचा खटला सुरू होता तर पैरवी अधिकारी म्हणून शौकत बेग व कोंम्पले यांनी काम पाहिले. या प्रकरणातील सर्व साक्षी पुराव्याची तपासणी करून तीन वर्षानंतर या खटल्याचा निकाल लागला आहे.

# कांद्याला प्रति क्विंटल २०० रुपयांचा फटका

लातूर : प्रतिनिधी लातूरचा कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवारी उच्चांकी म्हणजेच ३ हजार ३५४ क्विंटल कांद्याची आवक झाली. त्याला प्रतिक्विंटल भाव मिळाला २ हजार ३०० रुपये तर शिनिवारी १ हजार ३२२ क्विंटल आवक होती आणि भाव होता प्रतिक्विंटलला ३ हजार ५०० रुपये. केवळ दोन दिवसांच्या फरकाने कांद्या उत्पादक शेतक-यांना प्रतिक्विंटल २०० रुपयांचा फटका बसला आहे. कांद्याचे दर कोसळल्याने शेतक-यांच्या डोळ्यात पाणी आले आहे.लातूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवारी ३ हजार ३५४ क्विंटल कांद्याची आवक झाली. त्यास कमीभाव १२०० रुपये तर जास्तभाव २ हजार ३०० रुपये मिळाला. शनिवारी कमीभाव १५०० तर जास्त



भाव २२०० रुपये होता. मात्र केवळ दोन दिवसांत शेतक-यांना प्रतिक्विंटलमागे २०० रुपयांचा फटका सहन करावा लागत आहे. केंद्र सरकारने कुठलीही मुदत न देता अकस्मात कांद्यावर निर्यातीवर बंदी घातल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. बेमोसमी पाऊस आणि गारपिटीने कांद्याची प्रत अधिच खराब झाली. त्यात भाव घसरल्याने कांद्या मातीमोल विकण्याची वेळ शेतक-यांवर आली आहे.लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने दर शनिवारी आणि मंगळवारी कांदा, बटाटे, आद्रक, लसून यांचा लिलाव केला जातो. लातूर जिल्ह्यासह परिसरातील कांद्या उत्पादक शेतकरी बाजार समितीत कांद्या लिलावासाठी आणतात. मंगळवा-या लिलावात कांद्या प्रतिक्वंटलमागे २०० रुपयांपर्यंत कोसळल्याने शेतक-याच्या डोळ्यात अक्षरश: पाणी आले. कांद्याच्या आवकमध्ये वाढ होत असतानाच केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी लादल्यामुळे शेतक-यांना नुकसान सहन करावी लागत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE